CNR-MHNG100011892022

**फौजदारी किरकोळ अर्ज क्र. २४/२०२२**
**रश्मी – विरुध्द – प्रितीश**

**निशाणी क्र. १३ वर आदेश**
**(पारित दिनांक १६ ऑक्टोबर, २०२५)**

अर्ज व त्यावरील सामनेवाला यांच्या खुलाशाचे अवलोकन केले. उभय पक्षांचा युक्तीवाद ऐकला.

**अर्ज :**

२. प्रस्तुतचा अर्ज अर्जदाराने कौटूंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम २००५ चे कलम २३ अन्वये अंतरीम पोटगी खर्च मिळणेबाबत अर्ज दाखल केला आहे. अर्जदाराचे थोडक्यात कथन असे की, अर्जदार क्र. १ व २ हे गैरअर्जदार क्र. १ याचे पत्नी मुलगा आहे. अर्जदार यांची कायदेशीर व नैतीक जबाबदारी पालनपोषणाची गैरअर्जदार यांची असून गैरअर्जदार सदर जबाबदारी उचलण्यास टाळाटाळ करित आहे.

३. अर्जदार क्र. १ हिचे लग्न गैरअर्जदार सोबत धार्मीक पध्दतीने व रितीरिवाजाने दि. ०९.०२.२०२० रोजी झाले. सदर लग्न संबंधातून त्यांना एक मुलगा अर्जदार क्र. २ असून तो सुध्दा अर्जदार क्र. १ सोबत तिच्या माहेरीच राहत आहे. अर्जदारास सर्व गैरअर्जदारांनी मिळून मानसिक त्रास व वारंवार पैसे मागुन आर्थिक त्रास दिला आहे. अर्जदार ही गर्भवती असतांना गैरअर्जदार क्र. १ ते ३ यांनी अर्जदारच्या वडिलांना बोलाविले व 'तुमच्या मुलीस घेऊन जा, असे बोलून व अर्जदाराच्या आई वडील व भाऊ यांचयासोबत भांडण करुन अश्लील शिवीगाळ केली.

४. अर्जदार ही गर्भवती होती तेव्हापासुन तिच्या माहेरीच राहत आहे. तिच्या संपुर्ण बाळंतपणाचा खर्च अर्जदाराच्या वडिलांनी केला. मुलगा झाला तेव्हापासून औषधोपचारासाठी एकही पैसा दिला नाही. अर्जदार क्र. १ व २ चा संपुर्ण खर्च अर्जदाराचे वडिल करित आहे.

५. गैरअर्जदारावर अर्जदार क्र. १ व २ शिवाय कोणीही अवलंबुन नाही. गैरअर्जदार हे नोकरीवर असून त्याला प्रतिमाह अंदाजे रुपये तीस ते चाळीस हजार मिळतात. त्यामुळे अर्जदाराच्या पालनपोषणासाठी रु. १५,०००/–अंतरीम पोटगी म्हणून अर्जदाराला देण्यात यावी, अशी विनंती केली आहे.

**<u>खुलासा</u> :**

६. प्रस्तुतच्या अर्जावर गैरअर्जदार यांनी खुलासा दाखल केला. गैरअर्जदार हा सन २०२०–२१ मध्ये एचडीएफसी बॅंकेत सेल्स एजंट म्हणून दर महा बारा ते पंधरा हजार रायपुर येथे पगार कमवित होता. त्याच्यावर त्याचे आई वडील व अर्जदार अवलंबून होते. अर्जदाराचा भाऊ हरिचंद्र गवळी व त्याचा मित्र विजय खच्ची यांनी आपसी वैमनस्यातून किंवा बदला घेण्याच्या हेतूने दि. १७.०९.२०२२ रोजी गैरअर्जदार क्र. १ वर खोटी केस कलम ४०६, ४२० भादवी प्रमाणे पो.स्टे.तहसील नागपुर येथे दाखल केली. गैरअर्जदार क्र. १ ला पोलीसांनी त्यांच्या नोकरीच्या जागेवरुन अटक केली व त्याचा मोबाईल जप्त केला. त्यामुळे त्याला बॅंकेतील नोकरीवरुन काढून टाकण्यात आले. त्यामुळे त्याला कुठलेही उत्पन्नाचे साधन नाही व तो कमविण्यास असमर्थ आहे.

७. अर्जदार ही सुशिक्षीत व सबला आहे. तिचे बीसीसीऐ व एमबीए वित्त मध्ये पदवीधर आहे. अर्जदाराच्या मुलाचे नाव नाविण्य असून त्याच्या नावाने उमरेड बागेजवळ

नाविण्या कोल्ड ड्रिंक व आईस्क्रीम पार्लर उघडले आहे. त्यातून तिला दर महा वीस हजार रुपये उत्पन्न मिळते. त्याच प्रमाणे ती उमरेड येथील पथसंस्थेत कंपुटर ऑपरेटर म्हणून काम करते व त्यातून तिला पंधरा हजार मिळते. अर्जदारास उत्पन्नाचे साधन आहे. याऊलट अर्जदाराच्या गैरवागणुकीमुळे गैरअर्जदार क्र. १ ची नोकरी सुटली त्यास उत्पन्नाचे कोणतेही साधन नाही. गैरअर्जदार नोकरीवर असतांना त्यांनी कर्ज घेतले होते. परंतु, तो कर्जाचे हफ्ते फेडू शकला नाही. त्यामुळे सदरचे घर बँकेने लिलावात काढले आहे. गैरअर्जदार हा अर्जदार हिला भेटायला व घ्यायला गेला. परंतु, तिने स्वतःहून नकार दिला. सबब, सदर अर्ज खारीज करावा, अशी त्यांनी विनंती केली.

८. खालील मुद्दे माझे समक्ष उपस्थित होतात व त्यावरील कारणमिमांसेसह निष्कर्ष खालीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अर्जदार अंतरिम पोटगी मिळविण्यास पात्र आहे काय ? | ...होय |
| २. | काय आदेश ? | अंतिम आदेशाप्रमाणे |

## का र ण मि मां सा

**मुद्दा क्र. १ व २ करिता :**

९. युक्तीवाद ऐकला. अभिलेखावर कौटुंबीक घटना अहवाल दाखल आहे. तसेच अभिलेखावर नि.क्र. १२ अन्वये काही दस्त दाखल आहे. सदरचे दस्त हे गैरअर्जदार यांनी दाखल केल्याचे दिसून येते. अर्जदार हिचे परिचयपत्र, निमंत्रण पत्र, दोन फोटो, फिर्याद, जामीनाचा आदेश, आदेश, अर्ज, भाडे करारनामा व रिपोर्ट दाखल केला आहे. तसेच नि.क्र. १५ अन्वये नोटीस व गैरअर्जदार यांनी त्यांची संपत्ती व दायित्वाबाबतचे शपथपत्र दाखल केले आहे. अर्जदार यांनी संपत्ती व दायित्वाचे शपथपत्र नि.क्र. २१ अन्वये दाखल केले आहे.

अर्जदार हिने लग्नाची पत्रीका अभिलेखावर दाखल केली, स्वतःचे आधारकार्डची प्रत वतिने दाखल केलेली फिर्याद दाखल केली आहे.

१०. गैरअर्जदार क्र. १ व अर्जदार हे पती–पत्नी आहेत, असे अर्जावरुन व लेखी जबाबावरुन दिसून येते. अर्जदार यांनी अर्जामध्ये तिला काय त्रास दिला याबाबत कथन केले आहे. गैरअर्जदार यांनी खुलासा नि.क्र. १० अन्वये दाखल करुन तो साफपणे नाकारल्याचा दिसून येतो. अभिलेखावर कौटुंबीक घटना दाखल आहे. अर्जदार यांनी नि.क्र.२१ अन्वये संपत्ती व दायित्वाचे शपथपत्र दाखल केले आहे. गैरअर्जदार यांनी नि.क्र. १६ अन्वये संपत्ती व दायित्वाचे शपथपत्र दाखल केले आहे.

११. अर्जदार यांनी त्यांच्या नि.क्र. २१ च्या शपथपत्रात, गैरअर्जदार हा दरमहा एक लाख रुपये कमवतो व तो एचडीएफसी बँक, शाखा वर्धा येथे नोकरीला आहे, असे नमुद केले आहे. गैरअर्जदार यांनी नि.क्र. १६ अन्वये जे संपत्ती व दायित्वाचे शपथपत्र दाखल केले आहे, त्यामध्ये त्यांच्यावर सोळा लाखाचे कर्ज आहे, असे नमुद केले आहे आणि सध्या ते बेरोजगार आहे. त्यांचे शिक्षण बीएससी आयटी झाल्याचे नमुद आहे. तसेच त्यांचे आई वडील त्यांच्यावर अवलंबुन आहे, हे देखील नमुद आहे. ते कमवित नाही परंतु, त्यांच्यावर सोळा लाखाचे कर्ज आहे. ते, बँकेने त्यांना ब्लॅक लीस्ट केले, असे नमुद आहे. सर्व अकाऊंट त्यांचे जप्त करण्यात आले आहे, हे देखील त्यांनी नमुद केले आहे. अर्जदार हिचे उत्पन्न दरमहा ३५ हजार असे नमुद केले आहे. नाविण्या कोलड्रींक म्हणून दुकान आहे, असे नमुद केले आहे.

१२. त्या पुष्ठर्थ गैरअर्जदार यांनी नि.क्र. १२ अन्वये काही दस्तावेज दाखल केले

आहे. तसेच नाविण्या कोलड्रींक्सचे फोटो देखील अभिलेखावर दाखल आहे, निमंत्रण पत्रीका देखील दाखल आहे, परिचयपत्र दाखल आहे. त्यामध्ये आयसीआयसी बँक यामध्ये डेप्युटी मॅनेजर म्हणून अहमद नगर येथे कार्यरत आहे, असे नमुद आहे. हे परिचयपत्र रश्मी यांचे आहे.

१३. थोडक्यात गैरअर्जदार यांचा जो आक्षेप आहे की, त्यांच्याकडे उतप्ननाचे साधन नाही, त्यांच्यावर केस दाखल होती, त्या संबंधीचे दस्त दाखल आहे. त्यांच्या मालकीचे कोणतेही घर नाही, त्यांनी भाडे करारनामा देखील दाखल केला आहे. अर्जात व गैरअर्जदार यांच्या खुलाशात जी तथ्ये नमुद केली आहेत, ती परस्पर विसंगत आहे. त्यास पुराव्याची आवश्यकता आहे. तो एक गुणवत्तेचा भाग आहे. त्यामुळे त्याचे विवेचन मी करीत नाही. उभयतांना नातेसंबंध कबुल आहे. गैरअर्जदार क्र.१ यांनी त्यांचे जे नि.क्र.१६ अन्वये शपथपत्र दाखल केले आहे त्यात मासीक उत्पन्न नमुद केले नाही. परंतु, त्यांच्यावर कर्ज आहे. मासीक उत्पन्न नसतांना त्यांना बँकेने कर्ज दिले. हे सामान्य माणसाला न पटण्याजोगे कथन आहे.

१४. गैरअर्जदार क्र. १ यांनी कबुल केल्यावरुन अर्जदार ही गैरअर्जदार क्र.१ ची पत्नी आहे. अर्जदाराचे पालनपोषण करण्याची नैतिक व कायदेशीर जबाबदारी ही गैरअर्जदार क्र. १ ची आहे. गैरअर्जदार क्र. १ याने अर्जदार माहेरी राहते, तेव्हापासून तीला कोणतीही आर्थिक मदत केल्याचे सकृतदर्शनी दिसून येत नाही.

१५. अर्जातील परिस्थिती व गैरअर्जदार क्र. १ याचे उत्पन्नाचा विचार करता, माझे मते अर्जदार हिस दरमहा रुपये ३,०००/- (अक्षरी तीन हजार रुपये मात्र) अंतरिम पोटगी व अर्जदार क्र. २ नाविण्य यास दरमहा रुपये १,०००/- (अक्षरी एक हजार रुपये मात्र)

अंतरिम पोटगी  दाखल तारखे पासुन ते अर्ज निकाली लागेपर्यंत मंजुर करणे, न्यायोचीत होणार आहे. त्यामुळे मी मुद्दा क्र. १ चा निष्कर्ष होकारार्थी देत आहे. मुद्दा क्र. ३ करिता खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**: आदेश :**

- अर्ज अंशतः मंजुर करण्यात येतो.
- गैरअर्जदार क्र. १ यांनी अर्जदार हिस दरमहा रुपये ३,०००/– (अक्षरी तीन  हजार मात्र) अंतरिम पोटगी व अर्जदार क्र. २  नाविण्य यास  दरमहा रुपये १,०००/– (अक्षरी एक हजार रुपये मात्र)  अंतरिम पोटगी  म्हणून अर्ज दाखल तारखेपासून ते मुळ अर्जाचा अंतिम आदेश होई पावेतो अदा करण्याचे आदेशित करण्यात येते.
- प्रस्तुत आदेशाची प्रत अर्जदार व गैरअर्जदार क्र.१ यांना विनामुल्य देण्यात यावी.

सही/–

( रा.भा. डोळे )
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,उमरेड.

उमरेड.
दिनांक : १६.१०.२०२५.

**: प्रमाणपत्र :**

मी प्रमाणित करतो की, सदर पी.डी.एफ. संचिकेच्या मजकुरातील शब्द न शब्द मुळ न्यायनिर्णय / आदेशाप्रमाणे आहे.

लघुलेखकाचे नांव –

न्यायालयाचे नांव – सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर व न्यायदंडाधिकारी प्र. वर्ग, उमरेड.

पी.डी.एफ. अपलोड केल्याचा दिनांक –

स्वाक्षरीत/–

लघुलेखक श्रेणी –३